(TM)
# महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. पीआर-३/ कृषी/३२४००** **दिनांक :२१/१०/२०१०**

## वाणिज्य परिपत्रक क्र. १२५

**विषय :** **कृषीपंप धारक कृषी ग्राहकांना वीज बिलात इंधन समायोजन आकार आकारण्याबाबत.**

**संदर्भ :**
१) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००८/प्र.क्र.१८९६/ऊर्जा-५ दि.१.१०.२०१०.
२) पत्र क्र.पी-आर-३/एचएसबीसी-०१/३९८०१ दि. ४.११.२००८.
३) पत्र क्र.पी-आर-३/कृषी/३५४९ दि. ३१.०१.२००९.
४)पत्र क्र.पी-आर-३/कृषी/१४४३६ दि.१४.५.२००९.
५)पत्र क्र.पी-आर-३/कृषी/३५८७६ दि.१७.११.२००९.
६)पत्र क्र.पी-आर-३/कृषी/१९३४६ दि.१८.६.२०१०.

---

कृषी ग्राहक संघटनेच्या विनंतीनुसार गेल्या अनेक वर्षापासून कृषीग्राहकांच्यां बिलातून मे २००० पासूनचा इंधन समायोजन आकार माफ करण्याबाबत राज्य शासनाकडे विनंती केलेली होती. सदर इंधन समायोजन आकार माफ करण्याबाबतचा निर्णय घेईपर्यंत कृषी ग्राहकांकडून इंधन समायोजन आकार वगळून वीज बिलाची वसूली करण्यात यावी असे निर्देश शासनाने महावितरण कंपनीस दिलेले होते. त्या अनुषगाने संदर्भातील क्रमांक २ ते ६ च्या पत्रान्वये कृषी ग्राहकांकडून इंधन समायोजन आकार वगळून विज बिलाची वसूली करण्यात यावी अशा सुचना सर्व क्षेत्रीय अधिका-यांना वेळोवेळी देण्यात आलेल्या होत्या.

राज्य शासनाने संदर्भातील क्रमांक १ च्या शासन निर्णयाद्वारे मे २००० ते मार्च २०१० या कालावधीत कृषी ग्राहकांना आकारलेला इंधन समायोजन आकार माफ करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे तसेच शासनाने सदर शासन निर्णयात असेही नमूद केलेले आहे की, महावितरण कंपनीने सादर केलेल्या वर्ष २०१०-२०११ च्या वार्षिक महसूल मागणी प्रस्तावावर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार दि.१ एप्रिल २०१० पासून राज्यातील कृषी ग्राहकांना त्यांच्या वीज बिलात इंधन समायोजन आकार (एफसीए) महावितरण कंपनीने यापुढे आकारावा.

तरी शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रीय अधिका-यांना कळविण्यात येते की, **शासनाच्या आदेशानुसार एप्रिल २०१० पासून कृषी ग्राहकांची विद्युत देयके इंधन समायोजन आकारासह वसुल करण्यात यावीत.**

२१/१०

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत :प्रेक्षणयादीप्रमाणे**

D:\आरपीबी\Tariff\AG_FAC_Recovery.doc